**May 2014 Press Coverage**

**Divya Marathi 18th May**

दैनिक
# दिव्य मराठी
SUNDAY

नाशिक . रविवार, १८ मे २०१४ divyamarathi.com

# पावसाळ्याच्या प्रारंभीच 'अॅडव्हेंचर' रॅली



## विजेतेपदांचे संभ्रम होणार दूर

यापूर्वी प्रत्येक गटातील विजेता हा स्वतःला सर्वसाधारण विजेता म्हणवून घेऊ शकत होता. त्यामुळे प्रत्येक स्तरावर गोंधळ आणि संभ्रम निर्माण व्हायचा. मात्र, एफएमएससीआयने क्युबिक कपॅसिटीवर आधारित वर्गवारी ज़ाहीर केली आहे. १६०० सीसीपर्यंत, १६०१ ते २००० सीसीपर्यंत आणि २००१ ते ३५०० सीसी ( टर्बोसहित) अशा तीन श्रेणी करण्यात आल्या आहेत. त्यामुळे या प्रत्येक श्रेणीतील विजेता हाच सर्वसाधारण विजेता म्हणून ग्राह्य धरला जाणार आहे.

नवे काही...
धनंजय रिसोडकर...

भारतात होणाऱ्या काररॅलींमध्ये विदेशातील अधिकाधिक खेळाडूंनाही आकर्षित करण्यासाठी 'एफएमएससीआय' या राष्ट्रीय नियामक संस्थेने केलेल्या बदलांसह कार्सची राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा प्रथमच होणार आहे. प्रथमच इंडियन चॅम्पियनशिप रॅली नावाने होणाऱ्या रॅलीतील पहिला टप्पा 'महिंद्रा अॅडव्हेंचर रॅली ऑफ महाराष्ट्र'चा थरार नाशकात १३ ते १५ जूनदरम्यान नाशिककरांना अनुभवता येणार आहे.

या अॅडव्हेंचर रॅलीचे वैशिष्ट्य म्हणजे यंदा प्रथमच 'आर २' या श्रेणीतील गाड्यांनादेखील सहभागाची संधी आहे. इतकी वर्षे ज्या गाड्या या रॅलीत सहभागी व्हायच्या, त्या फक्त 'एन' श्रेणीतील होत्या. या बदलामुळे रॅलीतील वेगाचा थरार वाढू शकणार आहे.

**विदेशी खेळाडूदेखील मिळवू शकतात विजेतेपद :** २०१३ सालापासून विदेशी खेळाडूंना या रॅलीत सहभागाची संधी देण्यात आली होती. मात्र, यंदा विदेशी स्पर्धकांना विजेतेपदाचे गुणदेखील मिळू शकणार असल्याने त्यांचा सहभाग वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे इंडियन चॅम्पियनशिप रॅलीचा विजेता एखादा विदेशी रायडरदेखील ठरू शकतो. त्यामुळेच ही स्पर्धा आता खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय होणार आहे, असेदेखील म्हणता येणार आहे.



## 'एन' आणि 'आर २'मधील फरक

यंदा प्रथमच 'आर २' या श्रेणीतील गाड्यांनादेखील या रॅलीत सहभागाची संधी मिळणार असल्याने 'एन' श्रेणीतील गाड्यांबरोबरच 'आर २'च्या गाड्यादेखील पाहण्याची संधी मिळणार आहे. एफआयएच्या नियमानुसार 'एन' श्रेणीतील गाड्या म्हणजे ज्या गाड्या मार्केटमध्ये विक्रीला असतात. तसेच, त्यांचे सुट्टे भागही सहजपणे बाजारात उपलब्ध असतात. तर, 'आर २' श्रेणीतील गाड्यांसाठी ही बंधने शिथिल असतात. या गाड्यांची इंजिन क्षमता सोडून बाकी सर्व फेरबदल करण्यास परवानगी दिली जाते. त्यामुळे गाडीची क्षमता पूर्णपणे वापरली जाण्यासाठी लागणारे सर्व तांत्रिक बदल करण्यासाठी एफएमएससीआयने मान्यता दिलेली आहे. त्यामुळेच स्विफ्ट गाडी 'आर २' करताना ती ५ ऐवजी ६ गिअरचीदेखील करता येते. किंवा महिंद्रा एक्सयूव्हीला ४ गिअरदेखील ठेवणे शक्य आहे. अर्थात, हे बदल आधीच मान्य करून घ्यावे लागतात.

**Divya Marathi 30th May**

दैनिक दिव्य मराठी
दैनिक भास्कर समूहाचे मराठी वृत्तपत्र
शारापोवा तिसऱ्या फेरीत . ८ शुक्रवार नाशिक 30 मे २०१४ इन्फोसिसच्या आपटीने तेज

# महिंद्रा अॅडव्हेंचर कार रॅली सुरू होणार १२ जूनपासून

प्रतिनिधी | नाशिक

वेस्टर्न इंडिया स्पोर्ट्स् असोसिएशन (विसा) तर्फे आयोजित महिंद्रा अॅडव्हेंचर कार रॅली १२ जूनला सायंकाळी ४.३० वाजता नाशिक सिटी सेंटरच्या प्रांगणात सुरू होणार आहे.

रॅलीसाठी 'सर्व्हिस पार्क'येथील सिटी सेंटर मॉलमध्ये असून चाहत्यांना गौरव गिल, विक्रम मथायस यांसारख्या प्रसिद्ध खेळाडूंबरोबर छायाचित्र काढण्याची संधी मिळणार आहे.

१३ ते १५ जून सिटी सेंटरच्या पहिल्या माळ्यावरील पार्किंगमध्ये सर्व्हिस पार्क असेल. स्पर्धेतील गाडीत काही बिघाड झाल्यास ती सर्व्हिस पार्कमध्ये आणली जाते. रॅलीच्या तिन्ही दिवशी स्पेशल स्टेजेस् संपवूनही गाड्या याच ठिकाणी येतात. दुरुस्तीपर्यंत स्पर्धक विश्रांती घेतात. प्रत्येक गाडी दुरुस्तीसाठी १० मिनिटे व ३० मिनिटे दिले जातात.

पूर्ण सर्व्हिस टीमचे काम यांत्रिक पद्धतीने चालते. ३० मिनिटांत गाडीचे जवळपास सर्व पार्ट्स् व टायर्स बदलून तयार असतात. रॅलीतील प्रचंड वेगात जाणाऱ्या गाड्या कशा असतात, हे नाशिककरांना जवळून बघता यावे यासाठी १ जूनपासून सिटी सेंटरच्या मुख्य मंडपात रॅलीतील कार ठेवण्यात येणार आहेत.

**4th June 2014 Press Coverage**

**Divya Marathi**


दैनिक दिव्य मराठी

दैनिक भास्कर समूहाचे मराठी वृत्तपत्र

शारापोवा उपांत्य फेरीत . ११ | बुधवार | नाशिक ४ जून २०१४ | स्वस्त कर्जाचे दिव


थरार | भंडारदरा परिसरात रंगणार रॅली; नाशिकच्या प्रेक्षकांसाठी १३ जूनला विशेष आयोजन

# 'विसा' कार रॅली १२ पासून

## गौरव गिल, समीर थापर, सनी सिद्धू यांचा खेळ पाहण्याची संधी

प्रतिनिधी | सिडको

वेस्टर्न इंडिया स्पोर्ट्स असोसिएशन (विसा) यांच्या वतीने आयोजित इंडियन चॅम्पियनशिप रॅली १२ ते १५ जूनदरम्यान नाशिक शहर व परिसरात होणार आहे. १३ जून रोजी नाशिककरांसाठी विशेष कार रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे मोटार स्पोर्ट्सप्रेमींसाठी अनोखी संधी मिळणार आहे.

यासंदर्भात अधिक माहिती आयोजकांनी हॉटेल गेटवे येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. रॅलीचा पहिला राउंड भंडारदरासारख्या अवघड वळणाच्या घाटामध्ये होणार आहे. यात गौरव गिल, अमितरजित घोष, सनी सिद्धू व समीर थापर यांच्यातील रस्सीखेच पाहणे एक पर्वणीच ठरणार आहे.

या वेळी महिंद्रा ॲडव्हेंचरचे विजयकुमार, सिटी सेंटरचे अभय आमटे, सुला वाइनच्या सुनीला दुग्गड, हॉटेल गेटवेचे मॅनेजर नबोंदी, रेड एफएमचे रुद्रा, समीर बुरकुले, स्वाती पंडित उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी महिंद्रा ॲडव्हेंचर रॅलीसोबत हॉटेल गेटवे, रेड एफएम ९३.५, नाशिक सिटी सेंटर मॉल, सुला वाइन यांचेही सहकार्य लाभणार आहे.




वेस्टर्न इंडिया स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने आयोजित इंडियन चॅम्पियनशिप रॅलीच्या माहितीपुस्तिकेचे प्रकाशन करताना महिंद्रा ॲडव्हेंचरचे विजयकुमार, अभय आमटे, सुनीला दुग्गड, नबोंदी, रुद्रा, समीर बुरकुले, स्वाती पंडित.

## नाशिककरांसाठी विशेष रॅली

१३ जून रोजी नाशिकमधील फाळके स्मारक परिसरात दुपारी ३ वाजेपासून २.५ किमी अंतराची विशेष रॅली आयोजित करण्यात आली आहे. ही रॅली सर्वांना पाहता यावी, यासाठी खास सोय करण्यात येणार आहे. सिटी सेंटर मॉल येथे स्पर्धेसाठी पूर्ण तयार झालेली कार प्रेक्षकांना पाहण्यासाठी ठेवण्यात येणार आहे. नाशिककरांना स्पर्धकांशी संवादही साधता येणार आहे.

## रॅलीच्या स्पर्धेवर फिल्म

भारतीय मोटर स्पोर्ट्सच्या इतिहासात पहिल्यांदाच राष्ट्रीय विजेतेपद स्पर्धेवर फिल्म बनविली जात आहे. ही बाब पॉवरड्रीफ्ट टीम भारतीय मोटर स्पोर्ट्ससाठी आशादायक आहे. त्यांना नवी दिशा देण्याचे काम यामुळे होणार आहे. ऑटोमोबाइल्सवर अनेक फिल्म बनल्या आहेत. त्यातील तंत्रज्ञान क्रीडाक्षेत्रासाठी एक पुढचे पाऊल असेल, असेही आयोजकांनी सांगितले.

**Lokmat**

महाराष्ट्राचा मानबिंदू

लोकमत

पृष्ठे : १२+८+८=२८, किंमत: ₹ ३.५०

नाशिक, बुधवार, दि. ४ जून २०१४

# डोंगरमाथ्यावर थरार वेगाचा...

## १२ जूनपासून महिंद्राची मोटार स्पोर्ट्स रॅली

नाशिक : वेस्टर्न इंडिया स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने व विसाच्या सहकार्याने येत्या १२ जूनपासून नाशिक शहर व सिन्नर-घोटी परिसरात इंडियन रॅली चॅम्पियनशिपच्या पहिल्या फेरीचा थरार रंगणार आहे. १३ तारखेला फाळके स्मारकामध्ये या मोटार स्पोर्ट्स रॅलीचा थरार नाशिककरांना अनुभवता येणार असून, १४ व १५ तारखेला सिन्नर-घोटी परिसरातील भंडारदऱ्याच्या डोंगररांगांतील धोकादायक व अवघड वळणांच्या रस्त्यावर चॅम्पियनशिपच्या पहिल्या फेरीतील वेगाचा थरार रंगणार आहे.

इंडियन रॅली चॅम्पियनशिपअंतर्गत महिंद्रा एडव्हेंचर रॅली ऑफ महाराष्ट्र ही मोटार स्पोर्ट्सची स्पर्धा येत्या १२ ते १५ जूनदरम्यान नाशिक व परिसरात होत आहे. सदर स्पर्धेची पहिली फेरी सिन्नर-घोटीच्या भंडारदऱ्यातील अवघड घाटाच्या रस्त्यांवर १४ व १५ तारखेला होणार आहे. सदर स्पर्धेसाठी गतविजेता गौरव गिल, अमितरजित घोष, सनी सिद्धू, समीर थापर हे आघाडीचे मोटार स्पोर्ट्स ड्रायव्हर्स सहभागी होणार असून, येत्या गुरुवारपर्यंत स्पर्धेसाठीचा प्रवेश खुला आहे. आत्तापर्यंत २१ स्पर्धकांचा सहभाग निश्चित झाला असून, गरिमा अवतार व हर्षिता गौडा या दोन महिलांनीही प्रवेश निश्चित केला आहे. महाराष्ट्रातून स्थानिक महिंद्रा एडव्हेंचर संघासह पुण्याचा स्लाईज व औरंगाबादचा संघही स्पर्धेत सहभागी होणार आहे. स्पर्धेबाबतच्या पत्रकार परिषदेला महिंद्राचे विजयकुमार, हॉटेल गेट वेचे नमेंद्र, विसाचे अश्विन पंडित, अभय आपटे, रुद्रा, राहुल अलबेल, सुनीला मुदगल, समीर बुरकुले आदि उपस्थित होते. (वार्ताहर)

### सिटी सेंटरपासून स्पर्धेला प्रारंभ

◆ गेल्या वेळी स्पर्धेला राजीव गांधी भवन येथून प्रारंभ झाला होता, यावेळी सिटी सेंटर मॉल येथून स्पर्धेला १२ तारखेला दुपारी ४.३० वाजता प्रारंभ होईल. यावेळी मोटार स्पोर्ट्सची परेड शहरातील मुख्य रस्त्यावरुन होऊन हॉटेल गेट वे येथे संपेल. दरम्यान, नेहमी शहराबाहेर असलेले मोटार स्पोर्ट्स स्पर्धेचे सर्व्हिस स्टेशन व स्क्रुटिनी यावेळी सिटी सेंटर मॉल येथे असणार आहे. त्यामुळे मोटार स्पोर्ट्स प्रेमींना मोटार स्पोर्ट्स ड्रायव्हर्सची भेट घेता येणार आहे आणि स्पोर्ट्स मोटारला जवळून पाहता येणार आहे.

### १३ ला फाळके स्मारकात थरार

◆ स्पर्धेचे उद्घाटन झाल्यानंतर १३ तारखेला दुपारी ४.३० वाजेपासून फाळके स्मारकात वेगाचा थरार नाशिककर मोटार स्पोर्ट्स प्रेमींना अनुभवता येणार आहे. स्पर्धेची प्रत्यक्ष फेरी शनिवारी व रविवारी होणार असून, त्यापूर्वी नाशिककरांना सदरचा थरार अनुभवता येणार आहे.

**Lokmat Times**

NASHIK Wednesday, 4 June 2014 PUBLISHED FROM NASHIK,
www.epaper.lokmat.com/lokmattimes/
Lokmat Times

# Adventure of Mahindra Car Rally to begin soon

■ Nashikites will get a chance to experience the thrill of top-notch racing cars

LOKMAT NEWS NETWORK
NASHIK, JUNE 3




WISA's clerk of the course (Coc) Sameer Burkule along with other dignitaries gives information about the Mahindra Adventure Rally of Maharashtra in a press conference

Western Indian Sports Association (WISA) is bringing rally extravaganza for motorsports fans in Nashik. Mahindra Adventure Rally of Maharashtra, the first round of FMSCI (The Foundation of Motor Sports Club of India) Indian Rally Championship is scheduled during June 12 to June 15.

The rally will run in the challenging *ghats* of Bhandardara. The highest peak in the state- Kalsubai will be seen throughout all three stages. The only tarmac route in Indian Rally Championship will become more technical. Top drives like Gaurav Gill, Amitrajit Ghosh and Sunny Suddhu and Sameer Thapar will participate in the race. Along with these stalwarts two female drivers - Garima Avtaar and Harshita Gaud are also expected to participate in the rally.

Nashikites will get opportunity to enjoy the thrill of speed on Friday June 13 at Phalake Smarak from 3 pm onwards. This will be the first special segment of the event running for about 2.5 kms. On Saturday and Sunday the main rounds will be held. This year WISA has chalked out few spectators points from where spectators can enjoy the race. Good photography can also be done from here. FMSCI has altered the regulations for rally 2014 to accommodate players from foreign countries as well. Anyone from FIA's Asia zone countries can participate and win championship points in the rally.

Another feature of this year's race is service park which is established at City Centre Mall so that common people can observe important aspects of cars which will be a part of rally.

The rally would be flagged off by eminent personalities of Nashik on June 12 from City Centre Mall at 4.30 pm. WISA has appealed that those who want to be part of this adventure can become the volunteers.

For further information contact 0253-2316067/ 2316397 or log on towww.wisa.org.in, it was informed in a press conference

**Saimat**

सायंदैनिक
साईमत ™
वर्ष १ • अंक २७ • बुधवार दि. ४ जून २०१४ • पाने ८ • किंमत ₹ २.००

# नाशकात १२ पासून महिंद्रा अॅडव्हेंचर रॅलीचा थरार

**नाशिक (प्रतिनिधी) :** वेस्टर्न इंढिया स्पोटर्स असासिएशनतर्फे १२ ते १५ जूनदरम्यान नाशिकमध्ये महिन्द्रा अॅडवेन्चर रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. संपुर्ण भारतात सहा टप्यात होणाऱ्या या नॅशनल चॅम्पियनशीप स्पर्धेत यंदा प्रथमच सर्व्हिस पार्कचा प्रयोग राबविण्यात येणार आहे.

त्यामुळे मोटारप्रेमींसाठी हा औत्सुक्याचा विषय ठरणार आहे, अशी माहिती आयोजकांनी दिली आहे. हॉटेल गेटवे येथे झालेल्या पत्रकार परिषदेत आयोजकांनी सांगितले की, रॅलीचा पहिला राऊंड घोटी, भंडारदरा यांसारख्या अवघड वळणाच्या घाटात होणार आहे. तसेच ही स्पर्धा १०९ किमी असून यामध्ये एशिया पॅसिफीक चॅम्पियनशीपच्या गतवर्षीचा विजेता गौरव गील, तसेच अमित्रजीत घोष यांच्यातील विशेष चूरस अनुभवता येणार आहे असे सांगितले. या स्पर्धेसाठी रेड एफएम ९३.५, सुला वाईन, हॉटेल गेटवे, सिटी सेंटर मॉल, यांचे सहकार्य आहे. यावेळी महिन्द्रा अॅडवेन्चरचे विजयकुमार, सिटीसेंटर मॉलचे अभय आपटे, रेड एफएमचा रूद्रा, राहुल अलबेल, सुला वाईनच्या सुनिला दुग्गल, हॉटेल गेटवेचे मॅनेजर नवेंद्र, समीर बुरकुले, स्वाती पंडित उपस्थित होते.



**नाशिक : वेस्टर्न इंडिया स्पोर्टस् असोसिएशनतर्फे आयोजित इंडियन चॅम्पियनशिप रॅलीच्या माहितीपुस्तिकेचे प्रकाशन करताना महिंद्रा अॅडव्हेंचर्सचे विजयकुमार, अभय आमटे, सुनील दुक्कड, नबोंदी, रूद्रा, समीर बुरकुले, स्वाती पंडित.**

## विशेष सर्विस हब

यंदाच्या स्पर्धेत प्रथमच भारतात सर्व्हिस हब ठेवण्यात आले आहे. या सर्व्हिस हबमध्ये सिटी सेंटर मॉल येथे कारप्रेमींना स्पर्धेतील कार कशा असतात, त्यांची व्यवस्था कशी असते, गाडी खराब झाली असता किंवा पेट्रोलिंगसाठीची व्यवस्था कोणत्या परिस्थितीत केली जाते. हे प्रत्यक्षात अनुभवास येणार आहे. तसेच स्पर्धा सुरू असतांना गाड्यांचा रोमांचक थरार जवळून बघण्याचीही विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

## यंदा दोन महिला संघांचा समावेश

स्पर्धेत खेळाडूंना सहभागी होण्यासाठी ५ जूनपर्यंत मुदत देण्यात आली असून जास्तीत जास्त स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. तसेच मागील वर्षीच्या ८० टक्के खेळाडूंचा या स्पर्धेत सहभाग असणार आहे. यामध्ये नव्यानेच २ महिला टीमचा सहभाग करण्यात आला आहे. त्यात गरीमा अवतार आणि सुखमन यांची एक टीम तर हर्षित गौड, प्रशांत आर यांची दुसरी महिला टीम सहभागी होणार आहे.

**Sakal**

C नाशिक, बुधवार, ४ जून २०१४ । किंमत ₹ ३ ■ पाने १६ (१२+४) www.esakal.com

सकाळ



# विसा कार रॅलीचा १२ जूनपासून थरार

## स्पर्धेचा देशातील पहिला राउंड नाशिकमध्ये, यंदा विदेशी स्पर्धकांचाही सहभाग

सकाळ वृत्तसेवा

सिडको, ता. ३ : वेस्टर्न इंडिया स्पोर्टस् असोसिएशन (विसा) या भारतातील सर्वोत्कृष्ट आयोजकांतर्फे येत्या १२ ते १५ जूनदरम्यान महिंद्र अॅडव्हेंचर रॅली ऑफ महाराष्ट्रच्या इंडियन रॅली चॅम्पियनशिपचा पहिला राउंड नाशिक शहर व परिसरात होणार आहे, अशी माहिती आज पत्रकार परिषदेत देण्यात आली.

हॉटेल गेट वेमध्ये झालेल्या या पत्रकार परिषदेस महिंद्र अॅडव्हेंचरचे बिजयकुमार, सिटी सेंटर मॉलचे अभय आपटे, राहुल आलबेल, रेड एफएमचे रुद्रा, सुला वाइनच्या सुनीला दुग्गल, समीर बुरकुले, स्वाती पंडित आदी उपस्थित होते.

श्री. बुरकुले म्हणाले, की नॅशनल चॅम्पियनसाठीचा पहिला राउंड हा नाशिकमध्ये होत असल्याचा आनंद आहे. त्यानंतर देशात इतर ठिकाणी सहा राउंड होतील. प्रत्येक राउंडमध्ये मिळालेल्या पॉइंटसवरून सर्वांत जास्त राउंड मिळविणारा विजेता ठरतो. १२ ते १५ जूनदरम्यान नाशिक शहर व परिसरात भंडारदऱ्याच्या अवघड घाटात ही रॅली होणार आहे. एकूण तीन स्टेजेसमध्ये महाराष्ट्रातील सर्वांच उंच शिखर कळसूबाई सतत दृष्टीस पडणार आहे. त्यात संपूर्ण चॅम्पियनशिपमधली ही एकमेव डांबरी रस्त्यावर होणारी फेरी असल्याने हे आव्हान जास्त वाढणार आहे. गौरव गिल, अमितरजित घोषण, सनी सिद्धू, समीर थापर यांच्यामधील रस्सीखेच पाहण्याची पर्वणी प्रेक्षकांना या रॅलीच्या निमित्ताने मिळणार आहे. नाशिक शहरातील प्रेक्षकांसाठी १३ जूनला फाळके स्मारक परिसरात विशेष फेरी होणार आहे. साधारण २.५ किलोमीटर अंतराची ही स्पर्धेतील पहिली स्पेशल स्टेज आहे. भंडारदऱ्याजवळ स्टेजेसमध्ये आत जाण्यासाठी नाशिकहून पहाटे पाचपर्यंत निघावे लागेल.

'एफएमएससीआय'ने नियमात बदल केल्याने २०१४ मध्ये परदेशी स्पर्धकांना इंडियन रॅली चॅम्पियनशिपमध्ये भाग घेऊन विजेतेपदासाठी गुण जिंकणे शक्य झाले आहे.

स्पर्धेसाठी पूर्ण तयार गाडी सिटी सेंटर मॉलच्या मुख्य मंडपात ठेवली जाणार आहे. स्पर्धेपूर्वी केली जाणारी गाड्यांची तपासणी मॉलच्या पहिल्या मजल्यावरच्या पार्किंगमध्ये शुक्रवारी (ता. १३) होणार आहे. सर्व्हिस पार्कही त्याच ठिकाणी शुक्रवारपासून रविवार (ता. १५)पर्यंत असणार आहे. गुरुवारी (ता. १२) दुपारी साडेचारला नाशिकमधील मान्यवरांच्या हस्ते झेंडा दाखवून सिटी सेंटर मॉलच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळून स्पर्धेला सुरवात होईल. दरवर्षीप्रमाणे फोटोग्राफी स्पर्धा होणार आहे.




नाशिक : 'विसा'च्या महिंद्र अॅडव्हेंचर रॅलीसाठीच्या 'रॅली गाइड'चे हॉटेल गेट वेमध्ये प्रकाशन करताना बिजयकुमार, श्री. नवोंदी, अभय आपटे, राहुल आलबेल, सुनीला दुग्गल, समीर बुरकुले आदी.

**Loksatta**

मुंबई, बुधवार
४ जून २०१४
वर्ष ६७, अंक १२०, ४ रुपये,
पृष्ठे १२+वृत्तान्त, शहर आवृत्ती
तापमान
कमाल ३५ किमान २९
सूर्योदय : ६.०२ | सूर्यास्त : ७.१२

मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती!

LOKSATTA.COM | FACEBOOK.COM/LOKSATTALIVE | TWITTER.COM/LOKSATTALIVE | LOKSATTA.COM/APPS

# नाशिकमध्ये 'महिंद्रा ॲडव्हेंचर रॅली ऑफ महाराष्ट्र'

प्रतिनिधी, नाशिक

वेस्टर्न इंडिया स्पोर्ट्स असोसिएशन (विसा) यांच्या वतीने आयोजित इंडियन रॅली चॅम्पियनशिप या मोटर स्पर्धेची पहिली फेरी 'महिंद्रा ॲडव्हेंचर रॅली ऑफ महाराष्ट्र' १२ ते १५ जून या कालावधीत जिल्ह्यातील इगतपुरी, सिन्नर या तालुक्यांसह अहमदनगर जिल्ह्यातील भंडारदरा परिसरात रंगणार आहे. संपूर्णपणे डांबरी रस्त्यावरून होणारी इंडियन रॅली चॅम्पियनशिपमधील ही एकमेव फेरी असल्यामुळे ऐन पावसाळ्यात दऱ्याखोऱ्यांतील रस्त्यांवरून वाहन चालविताना स्पर्धकांचा कस लागणार आहे. या स्पर्धेविषयी मंगळवारी येथे आयोजित पत्रकार परिषदेत माहिती देण्यात आली. फेडरेशन ऑफ मोटर स्पोर्टस क्लब ऑफ इंडियाने (एफएमएससीआय) स्पर्धेच्या नियमांमध्ये बदल केल्यामुळे २०१४ मध्ये परदेशी स्पर्धकांना या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. त्यामुळेच इंडियन नॅशनल रॅली चॅम्पियनशिप (आयएनआरसी) या नावाने आतापर्यंत ओळखली जाणारी ही स्पर्धा आता इंडियन रॅली चॅम्पियनशिप (आयआरसी) या नावाने ओळखली जाणार आहे. या स्पर्धाअंतर्गत देशातील विविध ठिकाणी सहा फेऱ्या होणार असून प्रत्येक फेरीत प्रथम तीन क्रमांकावर राहणाऱ्यांना अनुक्रमे २५, १८, १५ याप्रमाणे गुण देण्यात येणार असल्याची माहिती पहिल्या फेरीच्या आयोजकांतर्फे समीर बुरकुले यांनी दिली. १२ जून रोजी दुपारी साडेचार वाजता नाशिक सिटी सेंटर मॉलपासून स्पर्धेला सुरुवात होणार आहे, तर हॉटेल गेटवे येथे १५ जून रोजी दुपारी समारोप सोहळा होणार आहे. गौरव गील, अमितर्जीत घोष, सनी सिद्धू यांच्यामध्ये या पहिल्या फेरीत आघाडी घेण्यासाठी तीव्र स्पर्धा राहण्याची शक्यता आहे. स्पर्धेसाठी आतापर्यंत २१ प्रवेशिका दाखल झाल्या असून त्यात गरिमा अवतार आणि हर्षाली गोडी या महिलांचा समावेश असल्याची माहिती स्वाती पंडित यांनी दिली. नाशिककरांसाठी १३ जून रोजी फाळके स्मारक परिसरात विशेष फेरी होणार असून अडीच किलोमीटर अंतराच्या या फेरीत वाहनचालकांच्या कौशल्याचा अनुभव उपस्थितांना घेता येणार आहे. पत्रकार परिषदेस प्रायोजकांपैकी महिंद्राचे बिजॉयकुमार, हॉटेल गेटवेचे नबेंद्रू, पॉवरग्रीप्टचे राहुल अलबेल, नाशिक सिटी सेंटर मॉलचे अभय आपटे, सुला विनियार्डच्या सुनिला दुग्गल, रेड एफएमचे रुद्रा हेही उपस्थित होते.

**5th June 2014 Press Coverage**

**Maharashtra Times**

maharashtratimes.com | www.mtonline.in

महाराष्ट्र टाइम्स

नाशिक, गुरुवार, ५ जून २०१४ । पाने १४ + नाशिक टाइम्स । शहर आवृत्ती । ₹ २.००

नाशिक Times सह

# नाशिककर अनुभवणार 'विसा' रॅलीचा थरार

**म. टा. प्रतिनिधी, नाशिक**

वेस्टर्न इंडिया स्पोर्टस् असोसिएशनच्या वतीने नाशिकच्या मोटारस्पोर्ट प्रेमींसाठी १२ ते १५ जून या कालावधीत इंडियन रॅली चॅम्पियनशीपचे आयोजन करण्यात आले आहे.

या चॅम्पियनशीपचा पहिला राऊंड नाशिकमध्ये होणार असून, इतर ६ राऊंड चेन्नई, कोलकाता, बेंगळूरू, चॅम्पियनशीपचा मंगळूर, कोइम्बतुर येथे होणार आहे. नाशिकमधल्या पहिल्या राऊंडमध्ये भारतासोबतच परदेशी स्पर्धकांचा सहभाग असणार असल्याने नाशिककरांना परदेशी गाड्यांचा थरारही अनुभवता येणार आहे. या सर्व राऊंडमध्ये सर्वांत जास्त पॉईंट मिळवणाऱ्या स्पर्धकाला राष्ट्रीय विजेतेपद बहाल करण्यात येणार आहे. स्पर्धा चार प्रकारात होणार असून, ओव्हरऑल ३५०० सीसी, २००० सीसी, आयआरसी ६०० सीसी, ६०० सीयूपी, असे त्याचे वर्गीकरण करण्यात आले आहे. या चॅम्पियनशिपमध्ये गोरव गील, अमितरजित घोष, सनी सिध्दू, समीर थापर हे राष्ट्रीय खेळाडू सहभागी होणार आहेत. त्याचप्रमाणे या स्पर्धेत प्रथमच महिला सहभागी होणार असून, त्यांचे कसब पणाला लागणार आहे.

शुक्रवारी १३ जून रोजी दुपारी तीन वाजता फाळके स्मारक येथे २.५ किलोमीटर अंतराची स्पर्धा होणार आहे. १४ तारखेला भंडारदरा परिसरात स्पर्धेला सुरुवात होणार असून, म्हैसवण घाट चढून गेल्यावर नागरिकांना स्पर्धा बघता येणार आहे. या गाड्या सिटी सेंटर मॉल येथे पार्क केल्या जाणार असून, गुरुवारी सकाळी मागील वर्षीच्या स्पर्धकांना भेटण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यांनतर शहरात गाड्यांची परेड आयोजित केली असून, नागरिकांना वेगवेगळ्या गाड्या पहाता येणार आहेत.

स्पर्धेदरम्यान नागरिकांना गाड्यांमधील वेगळेपण, त्यांच्यातील सेफ्टी मेजर्स, त्याचप्रमाणे गाडी तीस मिनिटांत खोलून कशी जोडली जाते, याचे प्रात्यक्षिक बघता येणार आहे. स्पर्धेचा संपूर्ण ५०० किलोमीटरचा टप्पा असून, तीन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत अंदाजे १५० खेळाडू सहभागी होतील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. १२ ते १५ जून या कालावधीत नागरिकांनी सिटी सेंटर मॉल येथे भेट देऊन परदेशी गाड्या बघण्याचा आंनद घ्यावा, असे आवाहन विसातर्फे करण्यात आले आहे.